डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे – ४

विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

# भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सेन्ट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२२ – २०२३

उच्च माध्यमिक (एच.एस.सी- १२वी ) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठिय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सेन्ट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना (Central Sector Scheme of Scholarship for College and University Students) २०२२-२०२३ राबविण्यात येते.

## किमान पात्रता व अटी:

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती /स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकिय अभ्यासक्रमांसाठी व कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेचे पालन करून User Id व Login तयार करून online अर्ज भरावा. ऑनलाईन अर्ज हा खालील वेबसाईटवर Department of Higher Education च्या अंतर्गत भरावा. भरलेला अर्ज **दि. ३० नोव्हेंबर ,२०२२** पूर्वी भरून त्याचे प्रिंट आउट काढून त्या सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडून महाविद्यालयाच्या कार्यालयात श्री.ओव्हाळ सर यांच्याकडे स. ११.०० ते १.३० या वेळेत जमा करावा. अपूर्ण भरलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन्न अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्कन करून ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे. शासनाने दिलेल्या विहित मुदतीत पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावायाची कृपया नोंद घ्यावी.

## विद्यार्थ्यांसाठी सूचना

१. विद्यार्थ्याने अर्ज भरताना उपरोक्त संकेत स्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाइन अर्ज भरावा.

२. विद्यार्थ्याने आधार क्रमांकाचा या पर्यायाचा वापर करून अर्ज भरावा.

३. विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेकरीता आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे, जोइंट खाते नसावे.

## शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे

१) सक्षम अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला / समाजाचा दाखला, २) सक्षम अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला ( २०२१-२२ चा ), ३) आधार कार्ड, ४) विद्यार्थ्याचे बँक खाते पासबुक, ५) रहिवासी दाखला, ६) मागील वर्षीची गुणपत्रिका, ७) चालू वर्षाची प्रवेश फी पावती, ८) विद्यार्थ्यांचे बोनाफाईड, ९) पासपोर्ट आकाराचा अर्जदाराचा फोटो

प्रभारी प्राचार्य
प्रभारी प्राचार्य
बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय
(स्वायत्त)
पुणे-४११००४.

दि. ०५/११/२०२२

उपरोक्त शिष्यवृत्ती च्या पात्रता अटी **www.scholarships.gov.in** या वेबसाईट वर आहेत.